आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१ डिसेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- भुवनेश्वर इथं पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप

- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विधानसभा गटनेतेपदी जितेंद्र आव्हाड, तर मुख्य प्रतोदपदी रोहित पाटील यांची निवड

- एड्सग्रस्तांच्या मृत्यूंमध्ये एकोणऐंशी टक्के घट झाल्याची आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांची माहिती

- तेलंगणात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत सात नक्षलवादी ठार

**आणि**

- सैद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत भारताला घवघवीत यश, पुरुष एकेरीत लक्ष्य सेन आणि महिला एकेरीत पी. व्ही. सिंधू  हीनं तर महिला दुहेरीत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी पटकावलं जेतेपद

**<><><><><>**

भुवनेश्वर इथे आयोजित अखिल भारतीय महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत समारोप झाला. तीन दिवस चाललेल्या या परिषदेच्या आजच्या शेवटच्या दिवशी प्रधानमंत्र्यांनी देशातली विविध राज्यं तसंच केंद्रशासित प्रदेशांच्या सुरक्षेशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. सायबर गुन्हे, किनारपट्टीलगतची सुरक्षा, माओवादी बंडखोरी हे चर्चेचे विषय होते. भारताच्या विकासात अडथळा आणणाऱ्या बाबी, सीमेपलीकडून होणारा दहशतवाद आणि तस्करी, देशांतर्गत नक्षलवादाचं आव्हान या मुद्यांवर यावेळी चर्चा  करण्यात आली. या परिषदेला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा,

केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल देखील उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पोलिसांसमोरची आव्हानं, पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्न या विषयांवर मार्गदर्शन केलं. भुवनेश्वर दौरा आटोपून प्रधानमंत्री आज संध्याकाळी दिल्लीला परतले.

<><><><><>

सीमा सुरक्षा दल आज आपला ६० वा वर्धापन दिन साजरा करत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सीमा सुरक्षा दलाच्या कामगिरीचं कौतुक करत वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे दल म्हणजे धैर्य, समर्पण आणि असामान्य सेवेचं प्रतीक असून या दलाची दक्षता आणि शौर्यानं आपल्या देशाच्या सुरक्षिततेत कायमच महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही सीमा सुरक्षा दलाला वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

निवडणुकीच्या धकाधकीमुळे तब्येत बरी नव्हती, मात्र आता आपण ठीक असल्याचं महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वार्ताहरांना सांगितलं. गेल्या काही दिवसांपासून शिंदे त्यांच्या सातारा जिल्ह्यातल्या घरी गेले होते, तिथून मुंबईकडे परतताना त्यांनी आज वार्ताहरांशी संवाद साधला. आपली कसलीही नाराजी नसून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाबाबत भाजपाचे ज्येष्ठ नेते जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य असेल याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विधानसभा गटनेतेपदी जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज मुंबईत पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. तसंच पक्षाच्या मुख्य प्रतोदपदी रोहित पाटील, तर प्रतोदपदी उत्तम जानकर

यांची निवड केल्याचंही त्यांनी जाहीर केलं. विधिमंडळ पक्षनेतेपदाचा निर्णय  झाला नसून येत्या काळात याबाबत पुन्हा बैठक घेणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. विधिमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदारांची संख्या कमी असली, तरी राज्याच्या जनतेचे प्रश्न धडाडीनं आणि प्रभावीपणे मांडू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत पक्षाला सर्व जागांवर समाधानकारक मतदान झालं असून आपल्या उणीवांवर मात करू असं MIM पक्षाचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी म्हटलं आहे. ते महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलत होते. आपण यापुढेही मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी वचनबद्ध असून त्यासाठी सातत्यानं आवाज उठवत राहू, असं त्यांनी सांगितलं.

अजमेर शरीफ दर्ग्यामध्ये शिव मंदिर असल्याच्या दाव्यावर ओवेसी यांनी मत व्यक्त केलं. अजमेर शरीफ दर्गा हे धर्मनिरपेक्षतेचं प्रतिक असून पूजास्थळ कायद्याचं पालन होणं आवश्यक आहे, असं ओवेसी म्हणाले.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमध्ये १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान महाकुंभ मेळा होणार असून ४३ कोटींहून अधिक भाविक या सोहळ्याला हजेरी लावतील, अशी अपेक्षा आहे. या भाविकांच्या सुविधेसाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशातल्या रस्ते आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

देशाच्या कोळसा उत्पादनात नोव्हेंबर महिन्यात ७ पूर्णांक २० शतांश टक्के वाढ झाली आहे. कोळसा मंत्रालयानं नोव्हेंबर महिन्यात ९० पूर्णांक ६२ दशलक्ष टन इतकं कोळश्याचं उत्पादन घेतलं असून गेल्या वर्षी याच कालावधीत ते ८४

पूर्णांक ५२ दशलक्ष टन इतकं होतं. उत्पादनात वृद्धी, कार्यक्षम वितरण आणि देशभरात कोळशाची उपलब्धता सुरळीत व्हावी यासाठी सदैव वचनबद्ध असल्याचं कोळसा मंत्रालयानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतातल्या इतिहासाच्या पुस्तकांनी देशातल्या वीरांना योग्य तो न्याय दिला नाही, अशी खंत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केली आहे. राजा महेंद्र प्रताप यांच्या एकशे अडतिसाव्या जयंतीनिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते आज बोलत होते. ही राष्ट्रीय अस्मितेशी केलेली प्रतारणा असल्याचं ते म्हणाले. भारताच्या स्वातंत्र्याचा पाया राजा महेंद्र प्रताप आणि अशा अनेक अनाम वीरांच्या बलिदानावर रचलेला आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मध्यप्रदेशातल्या इंदूर इथं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे पी नड्डा यांच्या हस्ते एड्स दिवस २०२४ या कार्यक्रमाचं उद्घाटन झालं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारनं परिक्षण आणि उपचार धोरण लागू केलं, त्याचा परिणाम म्हणून देशात आता एड्सग्रस्तांच्या मृत्यूंमध्ये एकोणऐंशी टक्के घट झाली आहे, असं नड्डा यांनी यावेळी सांगितलं. केंद्रसरकारनं एचआयव्ही संरक्षण कायदा २०१७ च्या माध्यमातून एड्सग्रस्तांच्या बाबतीत होणारा भेदभाव संपवला असंही ते म्हणाले. सामान्यांनीही एड्सग्रतांच्या प्रती संवेदनक्षम असायला हवं, असंही त्यांनी नमूद केलं. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना म्हणजे नाकोच्या वतीनं १९९२ पासून दरवर्षी १ डिसेंबर ला जागतिक एड्स दिवस पाळला जातो. 'सही रास्ते पर चले', ही या वर्षीच्या एड्स दिवसाची संकल्पना आहे.

**<><><><><>**

तेलंगणात, मुलुगु जिल्ह्यात आज सकाळी पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत किमान सात जहाल नक्षलवादी ठार झाले. या नक्षल्यांमध्ये राज्य समितीचा सचिव

भद्रू उर्फ पपण्णा हा विजापूरचा असून इतर दोन राज्य समिती सदस्यांचा समावेश आहे. पोलिसांचे खबरे असल्याचं सांगून त्यांनी दोन आदिवासींना ठार मारल्यानंतर काही वेळातच ही चकमक झाली. एटुरनगरम भागात नक्षलविरोधी कमांडो पथकाला आज सकाळी शोध मोहिमेदरम्यान नक्षलवाद्यांच्या हालचालींबाबत माहिती मिळाल्यानंतर हा गोळीबार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी दोन एके-४७ रायफलही त्यांच्याकडून जप्त केल्या आहेत.

**<><><><><>**

सैद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत भारतानं आज घवघवीत यश मिळवलं. पुरुष एकेरीत लक्ष्य सेन यानं सिंगापूरच्या जिया तेह याचा २१-६, २१-७ असा पराभव करून या स्पर्धेचं आपलं पहिलं जेतेपद पटकावलं. महिला एकेरीतही पी. व्ही. सिंधू हीनं चीनच्या वू लुओ यु हीचा २१-१४, २१-१६ असा पराभव करून तिसऱ्यांदा या स्पर्धेचं जेतेपद आपल्या नावे केलं. महिला दुहेरीत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं चीनच्या बाओ ली जिंग आणि ली क्वीन या जोडीचा २१-१८, २१-११ असा पराभव करून वेजेतेपद पटकावलं. पुरुष तसंच मिश्र दुहेरीत भारताच्या खेळाडूंना उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. पुरुष दुहेरीत भारताच्या पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय आणि साई प्रतिक के यांना चीनच्या जोडीवरून तर मिश्र दुहेरीत तनिशा क्रेस्टो आणि ध्रुव कपिला यांच्या जोडीला थाडलंडच्या जोडीनं पराभूत केलं.

**<><><><><>**

कॉमनवेल्थ कराटे चॅम्पियनशिपमध्ये ५३ किलो गटात महाराष्ट्रातल्या सोलापूरची आर्या साईनाथ यादवने रौप्यपदक पटकावलं आहे. दक्षिण आफ्रिकेत दर्बान इथं २६ नोव्हेंबरपासून ही स्पर्धा सुरु झाली. या स्पर्धेत ३९ देशांचा समावेश आहे. उद्या या स्पर्धेचा समारोप होईल.

***//<><><><><>//***